साप्ताहिक
# तडफदार नेता

कार्यकारी संपादक - राहुल जी. वडमारे संपादक - मोहिनी राहुल वडमारे उपसंपादक - राज साहेबराव ठाकरे

छत्रपती संभाजीनगर ◆ वर्ष १ ◆ अंक ८ ◆ मंगळवार, दि.२७ ऑक्टोंबर २०२६ ◆ पाने ४ ◆ किंमत रू ३ ◆ PRGI No.MHMAR/26/A5924

# औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## मतमोजणी प्रक्रिया अचूक, पारदर्शक व शांततेत पार पाडा – विभागीय आयुक्त जी. श्रीकांत
## विभागीय आयुक्तांकडून मतमोजणी केंद्राची पाहणी; अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर – विधान परिषदेच्या ०५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी उद्या, मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे. मतमोजणी प्रक्रिया अचूक, पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पाडण्यासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रेसोनेट लॉजिस्टिक्स एलएलपी येथे मतमोजणी होणार आहे. विभागीय आयुक्त श्रीकांत यांनी आज मतमोजणी केंद्राला भेट देऊन पूर्वतयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी मतमोजणी कक्षातील टेबलांची मांडणी, स्ट्राँग रूम, मतपेट्यांची सुरक्षितता, अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतमोजणीच्या फेऱ्या, निकाल संकलन व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली.

मतमोजणीसाठी ७० टेबलांची व्यवस्था करण्यात आली असून, प्राथमिक मतमोजणीच्या १३ फेऱ्यांचे नियोजन आहे. प्रत्येक टेबलवर एक पर्यवेक्षक व दोन सहाय्यक नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक सात टेबलांवर एका सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नियंत्रण राहणार आहे. टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी स्वतंत्र दोन टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे.

मतपत्रिकांचे वर्गीकरण, वैध व अवैध मतांचा निर्णय, पसंतीक्रमानुसार मतांची नोंद तसेच निकालपत्रकांची पडताळणी करताना विशेष दक्षता घ्यावी. मतमोजणीदरम्यान कोणतीही शंका अथवा अडचण उद्भवल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नियमानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.

मतमोजणी केंद्रावर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्हीद्वारे देखरेख, प्रवेश नियंत्रण व आवश्यक मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रसारमाध्यमांना अधिकृत माहिती



देण्यासाठी स्वतंत्र पथक नियुक्त करण्यात आले आहे.

यावेळी मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या तसेच टेबलनिहाय कामकाजाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. सर्वांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून मतमोजणी प्रक्रिया यशस्वी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त श्रीकांत यांनी दिले.

# महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी



**राज ठाकरे**

**छत्रपती संभाजीनगर –** वाल्मिकी रामायणाचे रचते महर्षी वाल्मिकी यांची जयंती घाटी हॉस्पिटल येथील शासकीय कर्मचारी निवासस्थान येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून घाटी दवाखान्याचे डीन डॉ. शिवाजी सुक्रे यांची विशेष उपस्थिती होती प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रथम महर्षी वाल्मिकी यांना पुष्पहार अर्पण करून नंतर त्यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांची महाआरती करण्यात येऊन त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सांगितले की महर्षी वाल्मिकी यांची शिकवण आपण अंगी करावी घाटीत येणाऱ्या सर्व पेशंट व त्यांच्या नातलग यांना चांगले वागणूक द्यावी त्यांच्याशी सभ्यतेने वागावे हीच खरी आज महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आपल्याकडून शुभेच्छा आहेत त्यांच्या जयंतीनिमित्त आपण ही गोष्ट स्वीकारून उद्यापासून आपल्या आचरणात आणाल अशी अपेक्षा करतो व सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा देतो यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते परिसरातील सर्व समाजातील नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला या कार्यक्रमाचे आयोजन राजेंद्र पोहाल यांच्यातर्फे करण्यात आले होते सर्व उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत राजेंद्र पोहाल यांच्यातर्फे फेटा बांधून करण्यात आले या कार्यक्रमाला एडवोकेट इक्बाल सिंग गिल संजय रिडलॉन श्री प्रवीण शिंदे अमित वाहुळ पत्रकार राज ठाकरे यांची विशेष उपस्थिती होती

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शंतनू उरेकर मंगल लाहोट सुभाष कागडा सुरेश बाबत सतीश कागडा वीरेंद्र पोहाल विशाल चरण अमोल पाखरे करण पोहाल शेरखान अनिकेत रगडे अजय चावऱ्या राहुल चावऱ्या करंजन वाहुळे राहुल अहिरे यांनी परिश्रम घेतले.

यावेळेस डॉक्टर शिवाजी सुक्रे यांनी येथे एक विशेष घोषणा केली त्यांनी सांगितले की घाटी हॉस्पिटल सध्या चेहरा मोहरा बदलत असून शासकीय कर्मचारी वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाचा प्रश्न बाकी असून लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार असून जुने निवासस्थान पाडून नवीन निवासस्थान बांधण्यात येणार आहे लवकरच या कामाला सुरुवात होणार असून निवासस्थानाच्या जागेतील साफसफाई करून कचराही उचलण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळेस जाहीर केले.

# अशी पार पडणार पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी प्रक्रिया

## ७० टेबलांवर प्राथमिक मतमोजणीच्या १३ फेऱ्या; सकाळी ८ वाजता प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर – औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी उद्या, मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रेसोनेट लॉजिस्टिक्स एलएलपी येथे होणार आहे. सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. प्राथमिक मतमोजणीसाठी ७० टेबलांवर १३ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

या निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी विभागातील आठ जिल्ह्यांमधील ८४२ मतदान केंद्रांवर मतदान झाले. प्राथमिक आकडेवारीनुसार १ लाख ९१ हजार ६८९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून, मतदानाची टक्केवारी ५८.६७ आहे. निवडणुकीत एकूण ४१ उमेदवार रिंगणात आहेत.

**मतमोजणीची सुरुवात कशी होणार?**

मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी सकाळी ७ ते ७.१५ या वेळेत मतमोजणी कक्षात उपस्थित राहतील. सकाळी ७.३० वाजता उमेदवार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम उघडण्यात येईल. त्यानंतर मतपेट्यांचे टेबलनिहाय वितरण होईल. सकाळी ८ वाजता गोपनीयतेची शपथ घेतल्यानंतर प्रत्यक्ष मतमोजणी सुरू होईल. त्याच वेळी टपाली मतपत्रिकांची मोजणीही सुरू करण्यात येईल.

**प्रथम मतपत्रिकांचे गठ्ठे तयार होणार**

प्रत्येक मतपेटीवरील सील तपासून ती उमेदवारांच्या प्रतिनिधींसमक्ष उघडली जाईल. मतपेटीतील मतपत्रिकांची संख्या तपासून मतदान केंद्राच्या हिशेबाशी पडताळणी केली जाईल. त्यानंतर प्रत्येकी २५ मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करण्यात येतील.

सर्व मतपत्रिकांचे गठ्ठे एकत्रित करून त्यांची सरमिसळ केली जाईल. त्यानंतर प्रत्येक टेबलवर एक हजार मतपत्रिका तपशीलवार मतमोजणीसाठी दिल्या जातील. ८४२ मतदान केंद्रांवरील मतपेट्यांच्या प्राथमिक मोजणीसाठी १३ फेऱ्या होणार असून, तेराव्या फेरीत केवळ दोन मतदान केंद्रांतील मतपेट्यांची मोजणी होईल.

**पसंतीक्रमानुसार मतांची मोजणी**

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पसंतीक्रम पद्धतीने होत असल्यामुळे प्रथम प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या पहिल्या पसंतीच्या वैध मतांची मोजणी केली जाईल. त्यानंतर एकूण वैध मतांच्या आधारे निवडून येण्यासाठी आवश्यक मतांचा कोटा निश्चित केला जाईल.

पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये कोणत्याही उमेदवाराने आवश्यक कोटा पूर्ण केला नाही, तर सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराला नियमानुसार वगळण्यात येईल. त्या उमेदवाराच्या मतपत्रिकांवरील पुढील उपलब्ध पसंतीक्रमानुसार उर्वरित उमेदवारांना मतांचे हस्तांतरण केले जाईल. आवश्यक कोटा पूर्ण होईपर्यंत किंवा नियमानुसार निर्णय होईपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील.

पसंतीक्रमानुसार मतांची मोजणी व हस्तांतरण करावे लागत असल्याने अंतिम निकालासाठी अतिरिक्त वेळ लागू शकतो. मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आवश्यक पडताळणी व निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

## ओहायो गव्हर्नरपदाच्या निवडणुकीत विवेक रामास्वामींच्या जाहिरातीमुळे वादंग

अमेरिकेत काँग्रेसच्या मध्यावधी निवडणुकांबरोबरच ५०पैकी ३६ राज्यांच्या गव्हर्नरपदाच्याही निवडणुका होत आहेत. ओहायोच्या गव्हर्नरपदासाठी रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार विवेक रामस्वामी यांनी प्रसिद्ध केलेल्या एका जाहिरातीमुळे सध्या अमेरिकेत वाद निर्माण झाला आहे. तसेच, प्रतिस्पर्धी उमेदवाराविरोधातील प्रचारात कोणती पातळी गाठायची असे प्रश्नही उपस्थित केले जात आहेत.ओहायोमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या ॲमी ॲक्टन या रामस्वामी यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार आहेत. त्यांच्याविरोधात रामस्वामी यांनी तयार केलेल्या जाहिरातीत ॲमी ॲक्टन यांच्या दुरावलेल्या आईने ॲमी यांच्यावर खोटारडेपणाचा आरोप केला, तसेच आपल्या मुलीला मत देऊ नये असे आवाहन ओहायोच्या मतदारांना केले. सध्या सुरू असलेल्या प्रचारातील ही सर्वाधिक स्फोटक जाहिरत असल्याचे मानले जात आहे. आईच्या आरोपांवर खुलासा करताना, ॲमी यांनी आपण १२ वर्षांच्या असताना आपले आईशी शेवटचे संभाषण झाले असे सांगितले. ॲमी यांनी सावत्र वडिलांवर बलात्काराचा आरोप केला होता, त्यानंतर त्यांना अटक झाली होती. ॲमी यांनी आपले त्रासदायक बालपण जनतेपासून लपवलेले नाही.

प्रतिस्पर्धी उमेदवाराची वैयक्तिक बदनामी करण्याचा प्रयत्न करण्याच्या रामस्वामी यांच्या या खेळीवर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. पण त्यांनी ही जाहिरात मागे घेण्यास नकार दिला आहे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उपाध्यक्ष जे.डी. व्हान्स यांनीही जाहिरातीची पाठराखण केली आहे. असे असले तरी, रिपब्लिकन पक्षाच्या अनेक नेत्यांनी या वादग्रस्त जाहिरातीपासून अंतर राखणे पसंत केले आहे. काहींनी ही जाहिरात नाकारली आणि काहींनी या प्रकाराची निंदा केली.

इंधनाचे वाढते दर, आयातशुल्क आणि ट्रम्प यांचे नेतृत्व या मुद्द्यांवर मतदारांमध्ये वाढत्या नाराजीमुळे ॲक्टन यांनी रामस्वामी यांना पिछाडीवर टाकल्याचा अंदाज अनेक खासगी आणि सार्वजनिक जनमत चाचण्यांमध्ये वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे इरेला पेटून रामस्वामी यांनी ॲक्टन यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याची टीका होत आहे. ही जाहिरात आणि ट्रम्प, व्हान्स यांनी रामस्वामी यांना दिलेला पाठिंबा, यामुळे ट्रम्प यांच्या काळात राजकीय चिखलफेकीने तळ गाठल्याची टीका केली जात आहे. इतकेच नाही, तर या जाहिरातीमुळे वातावरण रामस्वामी यांच्या विरोधात जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ओहायो हे गेल्या काही वर्षांपासून सातत्याने रिपब्लिकन पक्षाची पाठराखण करणारे राज्य ठरले आहे. यंदा मात्र, रामस्वामी यांच्या नकोशा धाडसाची किंमत मोजावी लागू शकते, असे चित्र आहे. इतकेच नव्हे तर ओहायोमध्ये सेनेटर जॉन हस्टेड यांच्या निवडणुकीवरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# उदंड राहिली साहित्य संमेलन

राज साहेबराव ठाकरे
मो.९५९५६२८७७७

नुकतेच छत्रपती संभाजी नगर शहरामध्ये एक आंतरराज्य साहित्य संमेलन पार पडले साहित्य संमेलन म्हटली की साहित्यिक लेखक आणि वाचक यांची मायदळी यांच्यासाठी पर्वणी होय पण दिवसेंदिवस साहित्य संमेलनाचा दर्जा खालावत चाललेला आपल्याला दिसून येतो एक १० वर्षांपूर्वी साहित्य संमेलन म्हटले की उत्साह असायचा त्यावेळेस मोजकेच साहित्य संमेलन व्हायचे आज सारखे साहित्य संमेलनाचे त्यावेळेस पीक आलेले नव्हते आज साहित्यिकाचा लेखकांचा महापूर आलेला आपल्याला दिसून येतो व्हाट्सअप फेसबुक वरील लेखक तर विचारायलाच नको छत्रपती संभाजी नगरातील या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस हे होते नावातच परिवर्तनवादी असलेल्या या साहित्य संमेलनातून काय परिवर्तन घडले हा वेगळा संशोधनाचा विषय असून यावर वेगळे लिखाण व संशोधन होऊ शकते या साहित्य संमेलनाला किती रसिक मायबापांची उपस्थिती होती हा विषय गौन आहे कारण की आज अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सुद्धा रसिक श्रोता हा येत नाही कारण पिढी बदलली आहे सोशल मीडियाचा जमाना आहे वाचक वर्ग कमी होत चालला आहे हे जरी सत्यअसले तरी साहित्य संमेलनाचा दर्जाही यामध्ये एक महत्त्वाचा भाग आहे साहित्य संमेलन म्हटले की वेगवेगळ्या कार्यक्रम त्यामध्ये आलेच अखिल भारतीय साहित्य संमेलनाला सरकारी अनुदान मिळत आहे त्याच्याच विरोधात विद्रोही साहित्य संमेलन होत आहे आज काही जणांचा साहित्य संमेलन घेण्याचा उद्देश म्हणजे फक्त निधी जमा करणे एवढाच उरला आहे का यामधून हा एक प्रश्न निर्माण होतो कारण ज्या नागरिकांचा ज्या कार्यकर्त्यांचा वाचनाशी लिखाणाशी काही दूर मात्र संबंध नाही असे काही आठ दहा डोके एकत्र येऊन साहित्य संमेलन घेतात यामधून मोठी आर्थिक उलाढाल होत असल्याची चर्चाही या निमित्त ऐकायला येत आहे असे जर होत असेल सरस्वती बरोबर जर लक्ष्मीचे दर्शन होत असतील तर हे किती प्रमाणातयोग्य आहे हे सारस्वतांनी ठरवावे या नावातच परिवर्तनवादी असलेल्या संमेलनातून किती परिवर्तन होईल हे तर येणारा काळच ठरवेल पण याच्याच बरोबर आता अजून एक साहित्य संमेलन होऊ घातलेले आहे या साहित्य संमेलनाला रिकाम्या खुर्च्यांशिवाय काहीच नसते जो वक्त बोलण्यासाठी उभा राहतो त्यालाही रिकाम्या खुर्च्यांसमोर आपले भाषण करावे लागते व आटपते घ्यावे लागत हे कुठेतरी थांबायला हवे एक वाचक म्हणून मी साहित्य संमेलनाच्या विरोधात नाही पण साहित्य संमेलन घेताना काही गोष्टीचे भान मात्र राहिले पाहिजे साहित्य संमेलनांमध्ये जे ठराव मांडले जातात पुढे त्याचे काय होते हे आजपर्यंत न सुटलेलं कोडे आहे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन असेल जागतिक मराठी साहित्य संमेलन असेल किंवा इतर दुसरे साहित्य संमेलन असतील यामध्ये जे ठराव घेतले जातात त्याचे पुढे काय होते पुढच्या वर्षी त्या ठरावांचे वाचन होते का त्याचा पाठपुरावा केला जातो का ? हे मात्र कोणालाच कळाले नाही साहित्य संमेलन व्हावीच प्रत्येक जिल्ह्यात व्हावीत नवे मी तर म्हणतो प्रत्येक विभागात व्हावीत प्रत्येक वार्डा वार्डात गावागावात व्हावी यामध्ये काही गोष्टींचे भान मात्र आयोजकांनी राखायला पाहिजे सर्व समाज सर्व जातीला यामध्ये समाविष्ट करून घेण्यात यावे एका विशिष्ट समाजापुरते हे साहित्य संमेलन राहू नये दुसरे म्हणजे ज्यांना साहित्यातील काही कळते ज्यांच्या नावावर काही पुस्तकं आहेत काही लेख आहेत काही कादंबऱ्या आहेत अशांनी या संमेलनाचे आयोजन केले तर सर्वांनाच बरे वाटेल काही साहित्यिकांची सारस्वतांची जातीवाद्यांची लेखकांची धन दांडगे यांची मक्तेदारी मोडी निघेल निघायलाच पाहिजे पण आपणही साहित्य संमेलन घेताना काही गोष्टीचे भान ठेवायला हवे त्याचा दर्जा राखला गेला पाहिजे त्या दर्जाचे श्रोतेही तिथं यायला पाहिजेत असे एक रसिक प्रेक्षक म्हणून मला वाटते शेवटी इतकेच म्हणावसे वाटते उदंड जाहली साहित्य संमेलने.

(लेखक हे स्वतः या वृत्तपत्राचे उपसंपादक असून यु सी एन टीव्ही न्यूज या वृत्तवाहिनीचे रिपोर्टर आहेत)

# महात्मा फुले द्विजन्मशताब्दी वर्ष : समतेच्या विचारांतून प्रगत महाराष्ट्राचा नवा अध्याय

**शिक्षण, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि लोककल्याणाच्या माध्यमातून महात्मा फुले यांचे विचार जनमानसात रुजविण्याचा राज्य शासनाचा संकल्प**

समाजाच्या परिवर्तनाची खरी सुरुवात विचारांच्या परिवर्तनातून होते. अज्ञानाच्या अंधःकारात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करून, विषमतेच्या भिंती भेदून आणि शिक्षणाच्या माध्यमातून वंचितांना प्रगतीची वाट दाखविणारे महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाचे अध्वर्यू होत. त्यांच्या विचारांना कृतीची जोड देत स्त्रीशिक्षणाचा पाया भक्कम करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनीही सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अजरामर स्थान मिळविले. अशा या महान समाजसुधारकांच्या विचारांचा जागर करण्यासाठी महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हे वर्ष म्हणजे केवळ एका महापुरुषाच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सोहळा नसून, समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांचा वर्तमानाशी संवाद घडविण्याची एक महत्त्वपूर्ण संधी आहे.

**विचारांचा वारसा, कृतीतून परिवर्तन**

महात्मा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून आत्मभान दिले. स्त्री-पुरुष समानता, जातिभेदाचे निर्मूलन, सामाजिक न्याय आणि विवेकनिष्ठ विचारांची पेरणी करत त्यांनी परिवर्तनाची नवी दिशा दाखविली. त्यांच्या विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याबरोबरच त्यावर विधायक उपाय सुचविण्याची त्यांची भूमिका. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या विविध विभागांमार्फत समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत विकासाच्या संधी पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पोहोचावा, नागरिकांना योजनांची माहिती सहज समजावी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होता यावे, यासाठी विविध जनजागृतीपर आणि लोकाभिमुख उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. योजनांची माहिती केवळ कार्यालयीन कागदपत्रांपुरती मर्यादित न राहता ती सर्वसामान्यांच्या जीवनाचा भाग व्हावी, हा या उपक्रमांचा मूलभूत हेतू आहे.

**शिक्षणातून समतेची पायाभरणी**

महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा केंद्रबिंदू शिक्षण हा होता. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून, माणसाला स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणारे आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बळ देणारे प्रभावी माध्यम आहे, ही त्यांची धारणा आजही तितकीच महत्त्वाची आहे.

याच जाणिवेतून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह' यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समता, बंधुता, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रप्रेमाची मूल्ये रुजविण्यावर भर दिला जात आहे. व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर उपक्रम आणि विविध स्पर्धांच्या माध्यमातून नव्या पिढीला महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली जात आहे.

महापुरुषांच्या जन्मभूमी आणि कर्मभूमींशी संबंधित ऐतिहासिक स्थळांचा विकास करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी अनुभव देण्याचे प्रयत्नही महत्त्वाचे ठरत आहेत. इतिहासाची पाने वाचण्याबरोबरच त्या इतिहासामागील संघर्ष, विचार आणि सामाजिक बांधिलकी अनुभवण्याची संधी नव्या पिढीला मिळणे, हीच अशा उपक्रमांची खरी फलश्रुती आहे.

**सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकास**

समाजाची प्रगती तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा विकासाचा प्रकाश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचतो. महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, अल्पसंख्याक कल्याण, बहुजन समाजाचा विकास आणि महिला व बालकल्याण या क्षेत्रांत विविध योजनांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना मदत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विशेष अनुदान योजना, चरित्रग्रंथांचे प्रकाशन, लघुकथा लेखन आणि विविध स्पर्धांच्या आयोजनातून सामाजिक प्रबोधनाला चालना दिली जात आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू कुटुंबांना दिलासा मिळावा, त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी आणि त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या उद्देशाने विविध कल्याणकारी उपक्रम राबविले जात आहेत. सवलतीच्या दरात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यासारख्या योजनांमधून सामान्य कुटुंबांच्या दैनंदिन जीवनातील आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या सर्व प्रयत्नांमागे केवळ आर्थिक मदतीची संकल्पना नसून, समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि सन्मान मिळावा, ही व्यापक भूमिका आहे. महात्मा फुले यांच्या समताधिष्ठित समाजरचनेच्या स्वप्नाशी या प्रयत्नांचे नाते जोडलेले आहे.

**युवकांसाठी कौशल्य आणि रोजगाराच्या नव्या वाटा**

आजच्या बदलत्या काळात शिक्षणासोबत कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. युवकांच्या हातांना काम, कौशल्यांना संधी आणि स्वप्नांना दिशा मिळावी, यासाठी रोजगार मेळावे, कौशल्यविकास कार्यक्रम आणि तंत्रशिक्षणाशी संबंधित विविध उपक्रम राबविले जात आहेत.

रोजगाराच्या संधी आणि युवक यांच्यातील दरी कमी करणे, युवकांना त्यांच्या कौशल्यांनुसार रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या उपक्रमांचा महत्त्वाचा उद्देश आहे. कौशल्याधारित प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख शिक्षणामुळे युवकांना बदलत्या औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातील संधींचा लाभ घेता येतो.

महात्मा फुले यांच्या विचारांतील श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन आणि सामाजिक उन्नतीची मूल्ये आजच्या कौशल्याधिष्ठित विकासाच्या संकल्पनेशी सुसंगत आहेत. युवकांना सक्षम करणे म्हणजे कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देणे आणि पर्यायाने समाजाच्या प्रगतीला गती देणे होय.

**ग्रामीण विकास, शाश्वत शेती आणि लोककल्याण**

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा समताधिष्ठित समाजनिर्मितीचा महत्त्वाचा आधार आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, जलसंवर्धन, शाश्वत शेती आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा विस्तार यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शेती आणि पाणी यांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन जलसंधारणाबाबत जनजागृती करणे, नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर वाढविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे आवश्यक आहे.

लोककल्याणकारी योजनांचा लाभ गावागावांतील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन, स्थानिक संस्था आणि विविध सामाजिक घटक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा ठरतो. शासनाच्या योजना आणि जनतेच्या गरजा यांच्यातील दुवा अधिक सक्षम झाल्यास विकासाची प्रक्रिया अधिक परिणामकारक बनते.

**संस्कृतीचे जतन, लोकसहभागाचे बळ**

समाजाचा सांस्कृतिक वारसा हा त्याच्या सामूहिक स्मृतींचा अमूल्य ठेवा असतो. पारंपरिक प्रथा, लोकपरंपरा, उत्सव आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे डिजिटल माध्यमातून जतन करण्याचे प्रयत्नही महत्त्वाचे ठरत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे म्हणजे परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधणे होय.

शासनाच्या उपक्रमांना नागरिकांचा सक्रिय सहभाग लाभल्यास त्यांचे सामाजिक महत्त्व अधिक व्यापक होते. प्रशासनाची तत्परता, विविध विभागांतील समन्वय, प्रसारमाध्यमांची साथ आणि नागरिकांची उत्स्फूर्त भागीदारी यांतून लोककल्याणाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीचे स्वरूप प्राप्त होते.

**समतेचा विचार, भविष्याची दिशा**

महात्मा जोतीराव फुले यांचे द्विजन्मशताब्दी वर्ष हे इतिहासाचे स्मरण करण्याबरोबरच वर्तमानाचे आत्मपरीक्षण करण्याचे आणि भविष्याची दिशा निश्चित करण्याचे वर्ष आहे. समाजात शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे, स्त्रियांना सन्मान आणि स्वातंत्र्य मिळवून देणे, वंचित घटकांना विकासाच्या प्रवाहात आणणे आणि प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठेने जगता येईल अशी समाजव्यवस्था निर्माण करणे, हीच त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पेरलेल्या परिवर्तनाच्या बीजांचा आज वटवृक्ष झाला आहे. मात्र, त्या वटवृक्षाची सावली समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आजही आपलीच आहे. शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक उपक्रम, सामाजिक प्रबोधन, कौशल्य विकास आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून समतेच्या मूल्यांना कृतीची जोड देणे आवश्यक आहे.

महापुरुषांचे विचार केवळ जयंती-पुण्यतिथीपुरते मर्यादित न राहता ते आपल्या दैनंदिन आचरणात उतरले, तरच परिवर्तनाचा प्रवास खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षाचा हाच संदेश आहेज्ञानातून जागृती, समतेतून एकता आणि लोककल्याणातून समृद्ध महाराष्ट्राची निर्मिती.

**- संजीवनी जाधव**
माहिती अधिकारी
जिल्हा माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर

# वधू-वर मेळावा व वधू-वर पुस्तिका प्रकाशन श्री समर्थ राममंदिर समर्थनगर येथे संपन्न




छत्रपती संभाजीनगर - सकाळी बरोबर ९.३० ला मेळावा सुरू झाला आज २१२ मुली आणि २७४ मुले ह्यांची नोंदणी आली होती. त्या पैकी प्रत्यक्षात ५७ मुली व १५२ मुले ह्यांनी सहभाग घेतला होता. आजच्या मेळाव्याला नाशिक काळाराम मंदिर चे महंत सुधीर दास ह्यांची प्रमुख उपस्थिती होती

तर अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ प्रदेशअध्यक्ष निखिल लातूरकर सह पुणे महिला सरचिटणीस वृषाली शेकदार ह्यांची प्रमुख उपस्थिती होती प्रथम स्वागत सुधीर दास महंत जी चे दोन्ही जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक व सुचेता पालोदकर ह्यांनी केले.निखिल लातूरकर ह्यांचे स्वागत दीपक कुलकर्णी दिलीप लाड अंजली गोरे स्मिता जोशी ह्यांनी केले.तर वृषाली शेकदार ह्यांचे स्वागत ॲड अश्विनी कुलकर्णी व सीमा नांदापुरकर ह्यांनी केले.

ह्या मेळाव्यास नगरसेविका श्वेता त्रिवेदी सह सुमित त्रिवेदी ह्यांची ही उपस्थिती लाभली. ह्यांचे स्वागत ह्या वेळी करण्यात आले

ह्या मेळाव्यास प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक ह्यांनी केले श्री महंत सुधीरदास ह्यांनी वधू वर ह्यांना लग्न गाठ कशी असते व भावी वधू आणि वर ह्यांनी संसार गाडा कसा चालवावा हा वर बोलून सर्वांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचलन नंदू अदवंत सर ह्यांनी तर आभार प्रदर्शन सुचेता पालोदकर ह्यांनी केले.

ह्या वेळी वधू वर वाचन दिलीप लाड स्मिता नगरकर ह्यांनी केले वरिष्ठ सल्लागार दीपक कुलकर्णी कु गायत्री न्यायाधीश सौ छाया खोचे वैभव जोशी कालिदास त्रिवेदी सुभाष जोशी मोहन काळे संदीप बेदरकर सुरेखा पारवेकर अंजली पराडकर गोविंद गालफाडे निलेश जोशी सौ किरण शर्मा हा कार्यक्रम यशस्वी होणे साठी परिश्रम घेतले.



## नासेर नजीर खान यांचा काँग्रेस पक्षामध्ये अधिकृत पक्षप्रवेश

छत्रपती संभाजीनगर - अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्राच्या सहप्रभारी मराठवाड्याच्या निरीक्षक रेहाना रियाज चिस्ती यांच्या हस्ते नासेर नजीर खान यांनी काँग्रेस पक्षामध्ये अधिकृतरित्या आज पक्षप्रवेश झाला काही महिन्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये तिकीट न मिळाल्यामुळे नासेर नजीर खान हे नाराज होते परंतु काँग्रेस पक्षाच्या नेत्या त्यांचे मनधरणी करून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय सचिव रेहाना रियाज चिस्ती काँग्रेसच्या मराठवाड्याच्या प्रभारी याची स्थिती मॅडम यांनी नासेर खान यांचा काँग्रेस पक्षामध्ये अधिकृतप्रवेश दिला काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारीनी त्यांचे स्वागत केले यावेळी अल्पसंख्यांक जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अनिस पटेल अल्पसंख्यांक शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोईन इनामदार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे सचिव साजिद कुरेशी सय्यद नदीम सौदागर जावेद खान पठाण फिरोज खान शोएब शेख उपस्थित होते.

## साप्ताहिक 'तडफदार नेता'च्या फुलंब्री तालुका प्रतिनिधीपदी मच्छिंद्र घुगे



छत्रपती संभाजीनगर - साप्ताहिक 'तडफदार नेता' या वृत्तपत्राच्या फुलंब्री तालुका प्रतिनिधी म्हणून मच्छिंद्र रायभान घुगे कार्यरत आहेत. जनतेच्या समस्या, स्थानिक प्रश्न आणि सामाजिक घडामोडींना वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचा फोडण्याची भूमिका साप्ताहिक 'तडफदार नेता'ने घेतली आहे.

'जनतेसाठी बिनधास्त, बेधडक भिडणार' हे ब्रीदवाक्य आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न, विकासकामे, शासकीय योजनांची माहिती तसेच विविध सामाजिक उपक्रमांना प्रसिद्धी देण्यावर भर दिला जाणार आहे.

फुलंब्री तालुक्यातील नागरिकांनी आपल्या परिसरातील समस्या, अन्याय-अडचणी आणि महत्त्वाच्या घडामोडींची माहिती प्रतिनिधींना द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## भौतिक मालमत्तेचे नाही, सद्धम्माचे हिस्सेदार व्हावे-प्रा.प्रतिभा अहिरे

### कन्नड येथील त्रिशरण बुद्धविहारात आश्विन पौर्णिमेनिमित्त उपक्रम

कन्नड - बुद्ध धम्मात आषाढ पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंतच्या तीन महिन्यांच्या कालावधीत बुद्धविहारात वर्षावास पाळला जातो. आश्विन पौर्णिमेला म्हणजेच कोजागरी पौर्णिमेला बुद्ध धम्मात महाप्रवारणा पौर्णिमा म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. तथागत गौतम बुद्धांनी मानवाला केवळ भौतिक मालमत्तेचे नव्हे, तर सद्धम्माचे खरे वारसदार आणि हिस्सेदार होण्याची मोलाची शिकवण दिली आहे, असे प्रतिपादन कवयित्री प्रा. प्रतिभा अहिरे यांनी केले.

कन्नड येथील त्रिशरण बुद्धविहारात कोजागरी आश्विन पौर्णिमेचे औचित्य साधून आणि वर्षावास समाप्तीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महिलांशी संवाद साधताना प्रा. प्रतिभा अहिरे बोलत होत्या. आपल्या मार्गदर्शनात प्रा. प्रतिभा अहिरे म्हणाल्या की, बुद्ध धम्मात सर्वच पौर्णिमांना विशेष महत्त्व आहे, परंतु आश्विन पौर्णिमेला महाप्रवारणा पौर्णिमा असे संबोधले जाते. या धम्मात आदिकल्याण, मज्झे कल्याण आणि परियोसान कल्याण, म्हणजेच आरंभी, मध्ये आणि अंतिमतः सर्वतोपरी कल्याणकारी



असणाऱ्या धम्माचे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात प्रामाणिकपणे अनुसरण केले पाहिजे. बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथातील भाग तिसरा : आवड-नावड या धम्मपदाचे सविस्तर वाचन करून त्यांनी उपस्थितांना मौलिक विवेचन सांगितले. गौतम बुद्धांनी मानवी जीवनातील दारिद्र्य पूर्णपणे नापसंत असल्याचे स्पष्ट केले आहे. श्रावस्ती मुक्कामी अनाथपिंडिक या सावकारास उपदेश करताना बुद्धांनी सांगितले होते की, मानवाने नेहमी योग्य, सन्मार्गाच्या आणि स्वतःच्या कष्टाच्या मार्गानेच धनार्जन केले पाहिजे. कष्टाने मिळवलेल्या संपत्तीमुळे माणूस स्वतः सुखी आणि आनंदी होतो, असे प्रा. अहिरे यांनी नमूद केले. बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथातील भाग तिसरा : आवड-नावड या धम्मपदाचे लता अवचार यांनी वाचन केले. वर्षावास समाप्तीच्या प्रसंगी सर्वांसाठी भोजनदान करणाऱ्यांचा सत्कार वर्षावास समाप्तीच्या प्रसंगी भोजनदान दिल्याबद्दल निर्मला उजागरे यांचा प्रा. प्रतिभा अहिरे व जनाबाई जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना कल्पना अशोक जाधव, मंगल पवार, शुभांगी सिरसाठ, विमल पवार, लक्ष्मीबाई वाहूळ, मंगल कांबळे, सुशीला सातदिवे आणि सुशीला पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त करून विचार मांडले. संगीता अळींग, राधा जाधव, कमल देहाडे, गुंताताई जाधव, शिल्पा उजागरे, ताराबाई बहिरव, अनिता अमृतफळे, शुभांगी सिरसाठ, सविता बोर्डे, पुष्पा साळवे, आशा जाधव, मंदा जाधव, कल्पना मनवर, अलका गवळी, माया जाधव आणि पद्मा गजबे यांच्यासह कन्नड तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन मंगल पवार यांनी केले.

## सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून छत्रपती संभाजीनगरमधील विविध विकासकामांची पाहणी; कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील विकासकामांना गती देण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यादरम्यान शहरातील विविध विकासकामांची पाहणी करून कामांच्या सद्यःस्थितीचा आणि प्रगतीचा आढावा घेतला. यामध्ये डॉ. हेडगेवार हॉस्पिटलजवळ उभारण्यात येत असलेली सारथी इमारत, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या फेज-२ अंतर्गत सुरू असलेली बांधकामे, नेहरूनगर येथील मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसाठीची निवासी इमारत, नगरनाका ते पडेगाव सहापदरी रस्ता तसेच वाळूजपंढरपूरकॅम्ब्रिजशेंद्रा एम.आय.डी.सी. या प्रस्तावित उन्नत रस्त्याच्या प्रकल्पाचा समावेश होता.

या पाहणीदरम्यान संबंधित प्रकल्पांची सद्यःस्थिती, बांधकामाचा दर्जा, कामांची गुणवत्ता आणि उर्वरित कामांच्या प्रगतीची माहिती घेतली. सर्व कामे निर्धारित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक सूचना संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना दिल्या.

डॉ. हेडगेवार हॉस्पिटलजवळ उभारण्यात येत असलेल्या सारथी इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कामाच्या प्रगतीची माहिती घेतली. या प्रकल्पांतर्गत प्रशासकीय इमारत (+४), मुलांचे वसतिगृह, मुलींचे वसतिगृह (+१२) आणि अभ्यासिका (+२) अशा चार इमारती उभारण्यात येत आहेत. मुलांच्या आणि मुलींच्या वसतिगृहांमध्ये प्रत्येकी ५२८ विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे. बांधकामाचा दर्जा राखून उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सारथी इमारतीचे उर्वरित बांधकाम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

कांचनवाडी येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या फेज-२ अंतर्गत सुरू असलेल्या प्रशासकीय इमारत, ग्रंथालय आणि लेक्चर हॉल या तीन इमारतींच्या बांधकामाचा आढावा घेतला. ग्रंथालय इमारतीच्या पूर्ण झालेल्या बांधकामाची पाहणी केली. तसेच प्रशासकीय इमारत आणि लेक्चर हॉलमधील फरशी, फॉल्स सिलिंग, भिंतींचे फिनिशिंग, अंतर्गत विद्युत व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेतली. उर्वरित कामांना गती देऊन ती नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी दिले.

नेहरूनगर येथे मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसाठी बांधण्यात येत असलेल्या +१० निवासी इमारतीची पाहणी करून बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. इमारतीतील खोल्या, हॉल, फ्लोरिंग, स्वयंपाकघर, स्वच्छतागृहे, विद्युत व्यवस्था, पाणीपुरवठा, लिफ्ट आणि अग्निशमन यंत्रणा यांसह विविध सुविधांची तपासणी केली. बांधकामाचा दर्जा आणि अंतर्गत कामांची गुणवत्ता राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या इमारतीचे बांधकाम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करून हस्तांतरित करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नगरनाका ते पडेगाव या सहापदरी रस्त्याच्या बांधकामाची पाहणी करून रस्त्याची गुणवत्ता, डांबरीकरण, ड्रेनेज व्यवस्था आणि कामाचा वेग यांचा आढावा घेतला. रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासोबतच निर्धारित वेळेचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षलागवडही केली. वाळूजपंढरपूर कॅम्ब्रिजशेंद्रा एम.आय.डी.सी. या प्रस्तावित उन्नत रस्त्याच्या



प्रकल्पाची पाहणी करून सद्यःस्थितीची माहिती घेतली. या प्रकल्पामुळे औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास, वाहतूक कोंडी कमी होण्यास आणि दळणवळणाला गती मिळण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन आवश्यक बाबींचा आढावा घेतला. या दौऱ्याप्रसंगी मंत्री श्री. अतुल सावे, खासदार श्री. संदीपान भुमरे, आमदार श्री. विलास भुमरे, माजी खासदार श्री. भागवत कराड तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# मराठा आरक्षण इंद्रा सहानी प्रकारणांतील निर्देशांचे उल्लंघन ठरेल-वरिष्ठ वकील संचेती

## पुढील सुनावणी ०५ नोव्हेंबर रोजी होणार

**मुंबई –** शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठा आरक्षणाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात न्या.कर्णिक न्या.मारणे न्या.जमादार यांचे घटनापीठा पुढे झाली.याचिकाकर्ते संजीत शुक्ला यांच्यातर्फे सीनियर कौन्सिल संचेती यांनी युक्तिवाद केला.

या सुनावणीस शासनाच्या वतीने काही अधिकारी आले.जे मागील काही सुनावणीस नियमित येत नव्हते.काल राज्याचे महाधिवक्ता यांचे दालनात झालेल्या बैठकीला २ वर्षाने मंत्रिमंडळ उपसमिती चे अध्यक्ष आणि शासनाचे विधी सचिव आणि शासनाचे अधिकारी उपस्थित होते. ही मिटिंग व्हावी यासाठी प्रथमतः मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक होत नव्हती ती सह्याद्री अतिथी गृह मुंबई येथे झाल्यानंतर हालचाल झाली.

ही बैठक झाल्यानेच ही हालचाल झाली नाहीतर न्यायालयात काय सुरू आहे याची विचारपूस सरकार कडे कोणी केल्याचे दिसत नाही. सगळे हवेत होते.या बैठकीत मराठा समाजाच्या वतीने अनवानी असणारे एकमेव जेष्ठ अभ्यासक उच्च न्यायालयातील सर्वच प्रकारणात असलेले मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दि. ९ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे राज्य भरातून समर्थन असलेले अन्नत्याग उपोषण आंदोलन पुकारले होते त्यात

**डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या मुख्य मागण्या**

केजी ते पीजी पर्यंत मराठा समाजाला ओबीसी सारख्या सर्व सवलती देण्यासाठी जी आर मध्ये दुरुस्ती आवश्यक असुन,मराठा समाजाला ओबीसी सारख्या सर्व सवलती के.जी. ते पी.जी. लेव्हल पर्यंत देतांना तांत्रिक,अतांत्रिक, वैद्यकीय शिक्षण,नोकरीतील नियुक्त्या –बढती आदी सर्व सवलती लागु करून खाजगी विद्यापीठ, डिम्ड युनिवार्सिटी मध्ये सुद्धा ओ.बी.सी सारख्या सवलती द्याव्यात या मध्ये वयाची अट शिथिलता तर द्यावीच परंतु ओबीसी आणि मराठा समाजातील निर्माण झालेली स्थिती कायम स्वरूपी मिटवण्या साठी ‘‘अराजकीय आरक्षण ‘‘ हा शब्द आणि वरील प्रमाणे दुरुस्ती करणारा सुधारीत शासनादेश तात्काळ निर्गमित करावे ही सुद्धा अंत्यन्त महत्वाची त्यांची गेली एक दशका पासूनची मागणी असुन याच सोबत त्यांनी सारथीला पाच हजार कोटींचा निधी तर स्व. आण्णासाहेब पाटील महामंडळास दहा हजार कोटी निधी,कर्ज मर्यादेत वाढ, व्याज परतावा, रखडलेल्या नियुक्त्या,आज पर्यंतची आंदोलन काळा तीलसर्व गुन्हे वापस घेणे आदी मागण्या बाबतचे जोरदार सादरी करण त्यांनी सविस्तरपणे मांडले होते. त्यानुसार आता एसइबीसी न्यायालयीन प्रकारणासाठी हस्तक्षेप याचिकाकर्ता, विधिज्ञ व अधिकारी यांची बैठक ऑक्टोबर शेवटी किंवा नोव्हेंबर पहिल्या आठवड्यात मुंबईत होणार आहे. मराठवाड्यातील आरक्षणा बाबत स्वतंत्र बैठक मुंबईत आयोजनाचे नियोजन होऊन इतर मागण्याची पूर्तता करण्यासाठी दर दोन महिन्यात एकदा मुंबईत बैठक घेण्याचे एक मताने ठरले आहे आणि हाच त्यांचा अन्नत्याग आंदोलनाचा विजय आहे

**थोडा इतिहास समजावून घेऊ!**

एस ई बी सी आरक्षण- २०१८ लागू असलेल्या काळात शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये तसेच महामंडळे व अनुदानित शिक्षणसंस्थामध्ये कायमस्वरूपी नोकरीस लागलेल्या उमेदवारांची संख्या सुमारे १०४०० आहे.

३० नोव्हेंबर २०१८रोजी एस ई बी सी आरक्षण लागू केल्याने त्या काळात मराठा तरुण तरुणींना शिक्षण व शासकीय सेवेत प्रत्यक्ष फायदा झाला. विविध महाविद्यालांमध्ये व व्यावसायिक अभ्यासक्रमां साठी लाखो शैक्षणिक प्रवेश झाले. तसेच वैद्यकीय प्रवेशातून सुमारे २४०० डॉक्टर झाले.मुंबई उच्च न्यायालयात टिकलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात फेटाळले गेले. त्यानंतर ई डब्लू एस लागू झाले असताना ते नाकारले गेले.त्यामुळे नव्या १०२ व्या घटना दुरुस्ती नंतर पुन्हा न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या मागासवर्ग आयोगाची शिफारस घेऊन पुन्हा मराठा समाजाला १० % आरक्षण दिलेल्या प्रमाणे शैक्षणिक प्रवेश व सुरू असलेली नोकरभरती यात अंमल बजावणी सुरू आहे.

एस ई बी सी २०२४ च्या नवीन आरक्षणांतर्गत पोलीस भरतीत १६१४, स्थानिक स्वराज्य संस्था ३६१ शिक्षक,पवित्र पोर्टल मार्फत ९८६ शिक्षक, हे नोकरीत लागले आहेत आणि त्यांचे भवितव्य या निकालावर अवलंबून आहे.ते ही या सुनावणीला येऊन सहभागी होत नाहीत.मात्र जेष्ठ अभ्यासक मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील हे आपली बॅग व त्यातील कागदपत्राचे ओझे घेउन न्यायालयात उपस्थित असतात पण यापूर्वी कायम स्वरूपी शासकीय नोकरीला लागलेले १०४०० उमेदवार किंवा समन्यवयक सामाजिक उत्तर दायित्व म्हणून न्यायालयीन लढ्यात कधीही येत नाहीत.

त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी टीम मुंबईचे रामचंद्र शेडगे सहकारी अनिल सुर्वे, बाळासाहेब इंगळे, सदाशिव बानुगडे,संतोष शेजवळ, संतोष दळवी,मारुती देसाई, राकेश वासुदेव, पांडुरंग रोडे,सुभाष देसाई, दिनेश पवार, शैलेश शिंदे सुशील निकम, विवेक शिंदे,अंतोष कांबळे, रवींद्र शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# सत्यशोधक कष्टकरी सभेचा कन्नड तहसीलवर मोर्चा, दुष्काळी मदत व सातबारा देण्याची मागणी

कन्नड – कन्नड राज्यातील भीषण दुष्काळाचे तातडीने निवारण करून शेतकरी, वनहक्क दावेदार व भूमिहीन ग्रामीण कष्टकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, असंवैधानिक एसआयआर प्रक्रिया बंद करावी, तसेच आदिवासी वनहक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी करून वनहक्कधारकांना संपूर्ण हक्काचा सातबारा उतारा देण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने गुरुवारी कन्नड तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून मोर्चाला सुरुवात झाली. हातात लाल बावटा व फलक घेऊन आंदोलकांनी ‘वनहक्क कायद्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे’, ‘एकच नारा सातबारा सातबारा’, ‘हमारी मांगे पूरी करो’, ‘जय जवान जय किसान’, ‘जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची’ आणि ‘संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे’ अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला. शेतकरी, आदिवासी, वनहक्क दावेदार, भूमिहीन शेतमजूर, महिला आणि विद्यार्थ्यांच्या या न्याय्य मागण्यांची शासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

तहसीलदार सारिका भगत यांच्या वतीने नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांनी निवेदन स्वीकारून मागण्या शासनापर्यंत




पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

या आंदोलनात करणसिंग कोकणी, किशोर ढमाले, रणजित गावित, कॉ. आर.टी. गावीत, होमाबाई गावीत, कॉ. शितल गावित, रावजी पथवे, रतन मधे, बाळू मेंगाळ, बुधा गावंडे, वच्छलाबाई वाघ, सखुबाई मेंगाळ, कौसाबाई पथवे, शांताबाई मेंगाळ, मावजी दोरे, नथू गांगड, कडूबा ननावरे, रमेश थोरात, बाळू थोरात, विष्णू थोरात, जयराम पथवे, धोंडीराम पथवे, कैलास पालोदकर आणि हरिचंद्र तळेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेची विभागावर दमदार कामगिरी

**छत्रपती संभाजीनगर –** पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेचे विद्यार्थी बीड येथे विभाग स्तरावर झालेल्या विभाग स्तरीय योग स्पर्धेत नंदिनी सिंगारे व प्रियका खिल्लारे या जोडीने आर्टिस्टिक योगामध्ये तर प्रतिज्ञा डूडवे हिने पारंपारिक योगात तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री शशिकांत दाभाडे, संस्थेचे सचिव श्री निवृत्ती पाटील गावंडे, क्रीडा शिक्षक श्री बळीराम मुरमे, यांनी योगशिक्षक श्री रमेश डकले तथा यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन २०२६-२७ चे कर्जवाटप धोरण जाहीर

## रब्बी हंगामासाठी २१० कोटी, तर खरीप हंगामासाठी ४९० कोटींचे उद्दिष्ट

छत्रपती संभाजीनगर – औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगरच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी खरीप व रब्बी हंगामातील पीककर्ज वाटपाचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पेरणीच्या हंगामात वेळेवर आर्थिक मदत उपलब्ध करून देणे, शेतीसाठी आवश्यक भांडवलाची गरज पूर्ण करणे आणि सहकारी बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम करणे, या उद्देशाने बँकेने कर्जवाटपाचे नियोजन केले आहे. रब्बी व खरीप हंगामासाठी एकूण ७०० कोटींचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट बँकेचे चेअरमन विलास संदिपान भुमरे व व्हाईस चेअरमन रामराव शेळके यांनी ही माहिती दिली.

**सन २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँकेने पुढीलप्रमाणे उद्दिष्ट निश्चित केले आहे :**

१. रब्बी हंगाम २०२६-२७ : दि.१ नोव्हेंबर २०२६ पासून रब्बी हंगामातील पीककर्ज वाटप सुरू करण्याचे नियोजन असून, या हंगामासाठी २१० कोटींचे कर्जवाटप उद्दिष्ट ठेवण्यात आले असून १०० टक्के पिककर्ज वाटप उद्दिष्ट पूर्ण करणारआहे. रब्बी पिकांच्या पेरणीसाठी बियाणे, खते, औषधे आणि इतर कृषी निविष्ठा खरेदी करण्याकरिता शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी बँकेकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत.

२. खरीप हंगाम २०२७ : दि.१ एप्रिल २०२७ पासून खरीप हंगामासाठी पीककर्ज वाटपाचे नियोजन करण्यात आले असून, या हंगामासाठी ४९० कोटींचे कर्जवाटप उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. अशा प्रकारे रब्बी व खरीप या दोन्ही हंगामांसाठी मिळून एकूण ७०० कोटींचे पीककर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट बँकेने ठेवले आहे.

बँकेच्या कर्जदार सभासद शेतकऱ्यांना नियमानुसार व पात्रतेनुसार पीककर्जाचा लाभ लवकरात लवकर मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक नियोजन करण्यावर भर देण्यात येणार आहे. हंगामाच्या सुरुवातीला कर्ज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना शेतीच्या कामांचे नियोजन करणे सुलभ होणार आहे.

**वैयक्तिक कर्ज मर्यादेत वाढ; व्याजदर १२ टक्क्यांपर्यंत कमी**

सभासद, खातेदार आणि ग्राहकांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन बँकेच्या संचालक मंडळाने विविध कर्ज योजनांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

१. वैयक्तिक कर्ज योजना : वैयक्तिक कर्जाची कमाल मर्यादा २५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली असून, व्याजदर १२ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे पात्र ग्राहकांना वैयक्तिक गरजांसाठी अधिक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

२. नवीन चारचाकी वाहन कर्ज योजना : नवीन चारचाकी वाहन खरेदीसाठी कर्जाची कमाल मर्यादा २५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली असून, व्याजदर ११ टक्के निश्चित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे पात्र ग्राहकांना वाहन खरेदीसाठी बँकेच्या माध्यमातून आर्थिक सुविधा मिळणार आहे.

३. गृहकर्ज योजना : घर खरेदी, बांधकाम किंवा गृहविषयक गरजांसाठी उपलब्ध असलेल्या गृहकर्ज योजनेचा व्याजदर ११ टक्के करण्यात आला आहे. ग्राहकांना तुलनेने सुलभ अटींवर गृहकर्ज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

४. सोनेतारण कर्ज योजना : ग्राहकांना तातडीच्या आर्थिक गरजांसाठी कर्ज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सोनेतारण कर्जाचे वाटप ११ टक्के व्याजदराने करण्याबाबत संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. या बदलांमुळे विविध आर्थिक गरजांसाठी बँकेच्या कर्ज योजनांचा लाभ घेणाऱ्या पात्र ग्राहकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. संबंधित योजनांच्या अटी, पात्रता, कर्ज परतफेडीचे नियम आणि इतर आवश्यक निकषांनुसार कर्जवाटप करण्यात येणार आहे.

**शेतकरी केंद्रस्थानी ठेवून बँकेच्या कामकाजाला गती**

औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील शेतकरी, विविध कार्यकारी सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची वित्तीय संस्था आहे. शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज उपलब्ध करून देणे, सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार सक्षम करणे आणि ग्राहकांना विविध कर्ज योजनांचा लाभ देणे, यासाठी बँकेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. खरीप व रब्बी हंगामासाठी मोठ्या प्रमाणावर पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट निश्चित करताना शेतकऱ्यांच्या कृषी गरजांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्याचबरोबर वैयक्तिक, वाहन, गृह आणि सोनेतारण कर्ज योजनांमध्ये मर्यादावाढ व व्याजदरातील बदल करून ग्राहकाभिमुख बँकिंगला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**चेअरमन विलास भुमरे यांची भूमिका**

बँकेच्या माध्यमातून शेतकरी सभासदांना पीककर्जाचा लाभ वेळेत मिळावा, कर्जवाटपाचे नियोजित उद्दिष्ट साध्य व्हावे आणि ग्राहकांना आवश्यक आर्थिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी बँकेचे संचालक मंडळ व सर्व कर्मचारी प्रयत्नशील आहे. कर्जवाटप प्रक्रियेला गती देणे, पात्र सभासदांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवणे आणि बँकेच्या कामकाजात अधिक कार्यक्षमता आणणे, यावर भर देण्यात येणार आहे. खरीप व रब्बी हंगामासाठी ७०० कोटींचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट आणि विविध कर्ज योजनांमधील सुधारित मर्यादा व व्याजदर हे जिल्ह्यातील शेतकरी, सभासद आणि ग्राहकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय आहेत. या माध्यमातून शेती क्षेत्राला आर्थिक बळ देण्याबरोबरच जिल्ह्यातील सहकार चळवळ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम करण्याचा बँकेचा प्रयत्न आहे.

हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक **मोहिनी राहुल वडमारे** यांनी मुद्रक सय्यद अहेमद सय्यद परवेज यांच्या मार्फत रेड प्रिंट्स सी-१५, संजय नगर, बायजीपूरा, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र -४३१००१, येथे मुद्रित करून हाऊस नं.८-२८-२०३, भीमराज नगर, उद्धव पाटील विद्यालयाच्या मागे, हिमायतबाग, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र - ४३१००१ येथून प्रकाशित केले.
● **संपादक – मोहिनी राहुल वडमारे** ● मो.क्र. 9673332444 ● PRGI No. MHMAR/26/A5924 ● Email Id - tadafdarneta@gmail.com